




दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे








वर्ष ६ । अंक ३२ । शुक्रवार २३ ऑक्टोबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


## एकवीरा चौक परिसरात प्रेम प्रकरणातून तरुणाचे कृत्य

# फ्लॅटमध्ये घुसून महिलेवर झाडली गोळी, स्वत:वर गोळीबार करून संपविले जीवन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील पाईपलाईन रस्ता परिसरात प्रेम प्रकरणातून महिलेवर गोळी झाडून नंतर तरुणाने स्वतःवरही गोळीबार करून जीवन संपविल्याची घटना आज सायंकाळच्या सुमारास घडली. या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे.

योगेश डोंगरे असे मृत तरुणाचे नाव असून, त्याने घटनेनंतर रतडगाव (ता. नगर) येथे स्वत वर गोळीबार करून जीवन संपविले. आज दुपारी चारच्या सुमारास योगेश डोंगरे हा संबंधित महिलेच्या एकवीरा चौक परिसरातील शिवनगर येथील



अपार्टमेंटमध्ये चौथ्या मजल्यावर असलेल्या फ्लॅटमध्ये आला दोघांमध्ये जोरदार वाद व झटापट झाली. यावेळी त्याने महिलेवर गोळीबार केला. त्यात महिला गंभीर जखमी झाली. तिला उपचारासाठी सिव्हील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच तोफखान्याचे डीवायएसपी दिलीप टिपरसे यांच्यासह तोफखान्याच्या पोलीस अधिकाऱ्यांनी भेट दिली. पोलीस या घटनेचा तपास करत असतानाच महिलेवर गोळीबार करणाऱ्या संबंधित योगेश डोंगरे याने रतडगाव येथे स्वतःवर गोळी झाडून घेत जीवन संपविल्याचे समोर आले.

# बहुचर्चित सिस्पे घोटाळ्यातील फरार आरोपी दशरथ रोडे एलसीबीच्या जाळ्यात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्रीगोंदा तालुक्यातील बहुचर्चित सिस्पे घोटाळ्यातील फरार आरोपीला जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. दशरथ विठ्ठल रोडे (वय ५१, रा. भारत गॅस गोदामासमोर, वडाळी रोड, ता. श्रीगोंदा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. या संदर्भात श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

गुंतवणूकदारांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी दाखल गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून सुरू आहे. या प्रकरणातील आरोपी पोलिसांना गुंगारा देत अनेक दिवसांपासून फरार होता. आर्थिक गुन्हे शाखेने या फरार आरोपीचा शोध घेण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखेला कळविले होते.

त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी तत्काळ एका विशेष पथकाची स्थापना करून शोधमोहीम सुरू केली. गुरुवारी (दि. २२ ऑक्टोबर) पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, सदर गुन्ह्यातील आरोपी दशरथ रोडे हा बेलवंडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गव्हाणवाडी फाटा (ता. श्रीगोंदा) परिसरात आला आहे.

या माहितीच्या आधारे एलसीबीच्या पथकाने



गव्हाणवाडी फाटा परिसरात सापळा रचून आरोपीला शिताफीने ताब्यात घेतले. पुढील तपासासाठी आरोपीला आर्थिक गुन्हे शाखेकडे हजर करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, पोलीस अंमलदार गणेश लोंढे, रोहित मिसाळ, प्रताप देवकाते आणि फुरकान शेख यांच्या पथकाने केली.

# आता तुम्ही किती निष्पक्ष आहात हे महाराष्ट्राला दाखवून द्या – राज ठाकरे

**मुंबई । वृत्तसंस्था–** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी ५०० कोटींच्या देवाण-घेवाणीचा आरोप करणारी ऑडिओ क्लिप भर पत्रकार परिषदेत दाखवून राजकीय बॉम्ब टाकला आहे. या घटनेनंतर राज्याच्या राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी उडत असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. तसेच, ही ऑडिओ क्लिप २ वर्षांपूर्वीची असून ती आत्ताच बाहेर कशी आली? असा सवाल देखील मुख्यमंत्र्यांनी उपस्थित केला आहे.



आता, मुख्यमंत्र्यांच्या चौकशी आदेशावर आणि प्रश्नावर राज ठाकरेंनी फेसबुकवरुन प्रतिक्रिया दिली. हा लोकशाहीची खून आणि बलात्कार आहे, आता तुम्ही किती निष्पक्ष आहात आणि तुम्ही कारवाई केली आहे हे महाराष्ट्राला दाखवून द्या, अशा शब्दात राज ठाकरेंनी मुख्यमंत्र्यांकडे चौकशीची मागणी केली. राज ठाकरे आपल्या पोस्टमध्ये म्हणतात, सध्या महाराष्ट्रात एक 'फ्रेंडशिप फाईल' ऑडिओ क्लिप व्हायरल होत आहे. तुम्ही सगळ्यांनी ऐकली असेल. भारतीय जनता पक्षाचे काही पदाधिकारी, या पक्षाच्या सोशल मीडियात महत्वाची भूमिका बजावणारे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे एक ज्येष्ठ पदाधिकारी आणि स्वतःला निष्पक्ष राजकीय विश्लेषक म्हणवणारे पण खरंतर भारतीय जनता पक्षाच्या चिखलफेक सैन्याचं चिलखत घालून फिरणारे काही युट्युब प्रभावक यांच्यातल्या मैत्रीची 'फ्रेंडशिप फाईल' ऑडिओ क्लिप. यांत कोणी कोणाला ५०० कोटी दिले इथपासून ते थेट माध्यमांना आम्ही कशी जरब दाखवू शकतो, ते एखादा भावनिक मुद्दा सरकारच्या अंगाशी आला तर लगेच त्या मुद्द्यापासून लोकांचं लक्ष कसं भरकटवायचं यासाठी नविन धार्मिक ध्रुवीकरणाचा मुद्दा कसा रेटला पाहिजे यासाठी काय केलं पाहिजे याचीही चर्चा करताना ऐकायला येत आहे. ही क्लिप खरंतर २९ मिनिटांची आहे. त्यातल्या ५०० कोटींचा मुद्दा गाजतोय. त्यावर खुलासे येतील आणि यायलाच पाहिजेत. पण भारतीय जनता पक्ष काय पद्धतीने समाज माध्यमं, माध्यमं यांच्यावर दडपशाही आणत आहे यावर पण चर्चा व्हायला हवी.

मुख्यमंत्री म्हणाले की ही क्लिप बहुदा २ वर्षांपूर्वीची असावी, ती आत्ताच का आली? खरतर ही क्लिप बाहेर आली कशी आणि ती आणली कोणी हा पण महत्वाचा प्रश्न आहे. खरतर याच्यात सरकार मधलं नेहमीप्रमाणे शहा काट'शाहाचं' राजकारणच दिसतंय, आणि हो फॉरेन्सिक अहवाल, त्यातील तांत्रिकता याच्यात महाराष्ट्राला गोल गोल घुमवू नका. महाराष्ट्राला जे कळायचं आहे ते कळलं आहे. ते तुम्हाला मान्य आहे आणि मुख्यमंत्री म्हणून तुम्ही किती निष्पक्ष आहात आणि तुम्ही कारवाई केली आहेत हे महाराष्ट्राला दाखवून द्या. तरंच या फॉरेन्सिकला अर्थ आहे, अन्यथा तुमच्या फायद्यासाठी वाकवलेला फॉरेन्सिक ठरेल, असे म्हणत राज ठाकरेंनी मुख्यमंत्री फडणवीसांना या घटनेवरुन निष्पक्ष तपास करण्याची मागणी केली आहे.

# सुपा येथून जेसीबी चोरणारी आंतरजिल्हा टोळी गजाआड

## एलसीबीच्या कारवाईत ४३ लाखांचा मुद्देमाल जप्त, चारजण अटकेत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सुपा परिसरातील इंडियन ऑइल पेट्रोल पंपावरून जेसीबी चोरून नेणाऱ्या आंतरजिल्हा टोळीच्या स्थानिक गुन्हे शाखेने मुसक्या आवळल्या आहेत. या कारवाईत पोलिसांनी चोरीला गेलेला जेसीबी आणि गुन्ह्यात वापरलेली क्रेटा कार असा एकूण ४३ लाख रुपयांचा मुद्देमाल छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून जप्त केला आहे. याप्रकरणी चार आरोपींना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २६ सप्टेंबर २०२६ रोजी गणेश अनिल रासकर (वय २८, रा. वाघुंडे, ता. पारनेर) यांचा जेसीबी सुपा येथील एका पेट्रोल पंपाच्या पार्किंगमधून अज्ञात चोरट्यांनी पळवून नेला होता. याप्रकरणी सुपा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. स्थानिक गुन्हे शाखा आणि सुपा पोलीस या गुन्हचा तपास करत असताना

पोलिसांना तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय सूत्रांद्वारे माहिती मिळाली की, विशाल दुबिले आणि त्याच्या साथीदारांनी हा जेसीबी चोरला असून तो छत्रपती संभाजीनगरमधील पैठण तालुक्यातील शेकटा शिवारात एका



**पथकात यांचा सहभाग**

ही कामगिरी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, सुपा पोलीस ठाण्याचेपोलीस निरीक्षक ज्योती गडकरी, पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड, तसेच पोलीस अंमलदार गणेश लबडे, श्यामसुंदर जाधव, किशोर शिरसाठ, अमृत आढाव, महादेव भांड, फुरकान शेख, प्रशांत राठोड आणि मेघराज कोल्हे यांच्या पथकाने केली.

वीटभट्टीजवळ लपवून ठेवला आहे. दिनांक २२ ऑक्टोबर रोजी पथकाने तिथे जाऊन विशाल काकासाहेब दुबिले (वय २२) आणि प्रदीप बाबासाहेब सुकासे (वय २०, दोघे रा. ता. गंगापूर) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी क्रेटा गाडीतून येऊन जेसीबी चोरल्याची कबुली दिली. त्यानंतर त्यांच्या माहितीवरून गौरव योगेश त्रिभुवन (वय १९) आणि संग्राम चंद्रहास डरे (वय २०, दोघे रा. ता. वैजापूर) या इतर दोन साथीदारांनाही बेड्या ठोकण्यात आल्या.

पोलिसांनी आरोपींकडून ३० लाख रुपये किमतीचा एक जेसीबी आणि १३ लाख रुपये किमतीची एक विनाक्रमांकाची क्रेटा कार असा एकूण ४३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पुढील तपास सुपा पोलीस करीत आहेत.

# भाजपमध्ये आलेल्या नवीन माणसाचे काय हाल होतात, हे मी बघितले आहे

## ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांचे वक्तव्य । मोदींचे शुभेच्छाफलक लावणाऱ्या नातवाचे केले समर्थन

**मुंबई । वृत्तसंस्था** – काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांचे नातू शिखर पाहारिया यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने बॅनरबाजी केली होती. या संदर्भात बोलताना सुशीलकुमार यांनी पंतप्रधानांना शुभेच्छा देणारे बॅनर लावले म्हणून काय बिघडले असे म्हणत शिखर पाहरिया यांचे समर्थन केले. एक दिवस असं केल्याने काय बिघडलं. मी सुद्धा नुकताच पंतप्रधानांना भेटलो असे शिंदे म्हणाले. तसेच मला देखील अनेकवेळा भाजपमध्ये या असं म्हटलं गेलं. मात्र, मी म्हटलं मी तिकडे (काँग्रेस) आहे तर इकडं (भाजप) मध्ये येऊन परत काय करणार असे वक्तव्य शिंदे यांनी केले.



शिंदे म्हणाले की, परवा बातमी आली माझ्या नातवाने पंतप्रधानांना शुभेच्छा देणारे बॅनर लावले आहेत. एक दिवस असं केल्याने काय बिघडलं, मी सुद्धा नुकताच ■ पान ४ वर

# मनोज जरांगे हे डुप्लिकेट मराठा, सुपारी घेऊन शिंदेविरोधात बोलतात

## जालन्याचे शिवसेना उपजिल्हाप्रमुख धनंजय पोहेकर यांची टीका

**जालना । वृत्तसंस्था** – मराठा आंदोलक मनोज जरांगे हे डुप्लिकेट मराठा आहेत, अशी टीका करत शिवसेनेचे जालना उपजिल्हाप्रमुख धनंजय पोहेकर यांनी जरांगे यांच्या तोंडाला काळं फासणार असल्याचा इशारा दिला आहे. मनोज जरांगे यांनी मोठा फटाका फोडण्याची भाषा केली होती, मात्र त्यांनी फुसका फटाका टाकला, अशी टीका पोहेकर यांनी केली. एकनाथ शिंदे आणि श्रीकांत शिंदे यांना बदनाम करण्याची सुपारी जरांगे यांनी घेतली आहे, असा आरोपही त्यांनी केला. सर्व मराठा समाज एकनाथ शिंदे यांच्या पाठीशी असल्याचा दावाही धनंजय पोहेकर यांनी केला आहे.

शिवसेनेचे जालना उपजिल्हाप्रमुख धनंजय पोहेकर यांनी म्हटलं की, मनोज जरांगे, काल



पत्रकार परिषदेमध्ये म्हणाला, मोठा बॉम्ब फोडणार आहे. अरे मनोज जरांगे, तू बॉम्ब तर नाही फोडला, पण लवंगी फटाक्यात किंवा सारखा असा फुसका, लवंगी फटाक्यासारखं टाकून दिलं, पण त्याच्यात पुरावे दाखव मनोज जरांगे, पण तुझ्या तोंडाला काळं फसणार आहे शिवसैनिक जालना जिल्ह्याचा, एवढं लक्षात ठेव. तू वरूनही तितकाच काळा आहे, आणि आतून सुध्दा तितकाच काळा आहे. एकनाथ शिंदे यांना आणि श्रीकांत शिंदे यांना तू बदनाम करायच्या सुपार्या घेतल्यास आणि ती कोणी दिली, ती लवकरच आम्ही उघड आणणार आहे. पण एकनाथ शिंदे आणि श्रीकांत शिंदे याच्या पाठीशी मराठा समाज आहे, सर्व मराठा समाज एकनाथ शिंदे आणि श्रीकांत शिंदे यांच्या सोबत आहोत, तेही ९६ कोळी तुझ्यासारखे डुप्लिकेट नाही, पाटील नाव लावू नको, तू पाटील नाहीस, तू पाटील नाव लावू नको, तू ९६ कुळी नाहीस, एकनाथ शिंदे आणि श्रीकांत शिंदे हे ९६ कुळी आहेत, असंही पोहेकर यांनी म्हटलं आहे.

## दै. आकर्षण निवडक

### सर्वोच्च न्यायालयाच्या त्या निर्णयाचे पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने स्वागत

अहिल्यानगर - भारतीय संसदीय लोकशाही अधिक पारदर्शक, जबाबदार आणि नागरिककेंद्रित बनविण्याच्या दिशेने सर्वोच्च न्यायालयाने १६ ऑक्टोबर रोजी महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने नामनिर्देशनपत्र अथवा शपथपत्रात जाणीवपूर्वक खोटी माहिती दिल्यास किंवा आवश्यक माहिती लपविल्यास, सामान्य नागरिकालाही लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम १२५-अ अंतर्गत फौजदारी तक्रार करण्याचा अधिकार असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेने या निर्णयाचे स्वागत करताना, त्यातून लोकशाहीच्या शुद्धीकरणाला आणि निवडणुकांतील आर्थिक पारदर्शकतेला महत्त्वाची चालना मिळेल, अशी भूमिका जाहीर केली आहे.न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती शील नागू यांच्या खंडपीठाने राजकुमार मडकी विरुद्ध डॉ. शैलेंद्र बेलदाळे या प्रकरणात दिलेल्या निर्णयामुळे उमेदवारांच्या घोषणांची सत्यता तपासण्यासाठी केवळ निवडणूक आयोगावर अवलंबून राहण्याची आवश्यकता नाही, हे स्पष्ट झाले आहे. निवडणूक उमेदवारांना त्यांच्या मालमत्ता, आर्थिक दायित्वे, जोडीदार व अवलंबितांची संबंधित संपत्ती, गुन्हेगारी पार्श्वभूमी आदी तपशील नियमानुसार जाहीर करावे लागतात. मात्र, निवडणुकीतील प्रतिज्ञापत्र आणि प्रत्यक्ष आर्थिक व्यवहार यांमध्ये तफावत असल्यास तिची पडताळणी करण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घेतला पाहिजे, असे संघटनांनी म्हटले आहे.जमिनींच्या नोंदी, नोंदणीकृत खरेदीखते, कंपन्यांमधील आर्थिक हितसंबंध आणि कायदेशीररीत्या उपलब्ध कागदपत्रे यांच्या आधारे उमेदवारांच्या घोषणांची तपासणी झाल्यास लपविलेली संपत्ती किंवा संशयास्पद व्यवहार उजेडात येण्याची शक्यता वाढेल. अर्थात, बेनामी व्यवहार अथवा काळ्या पैशाचा गुन्हा स्वतंत्र पुराव्यांच्या आणि संबंधित कायद्यांच्या आधारेच सिद्ध करावा लागेल.सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १९५(१) मधील निर्बंध लोकप्रतिनिधित्व अधिनियमाच्या कलम १२५-अ ला लागू होत नाहीत. त्यामुळे खोट्या निवडणूक शपथपत्राबाबत तक्रार करण्यासाठी संबंधित सरकारी अधिकारी किंवा निवडणूक आयोगानेच पुढाकार घेतला पाहिजे, असा कायदेशीर आग्रह धरता येणार नाही. या निर्णयामुळे कोणत्याही राजकीय पक्षाच्या उमेदवाराविरुद्ध पुराव्यांवर आधारित तक्रार करण्याचा नागरिकांचा मार्ग स्पष्ट झाला आहे.पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या मते, खऱ्या लोकशाहीसाठी केवळ मतदान पुरेसे नाही. मतदानापूर्वी माहितीची पडताळणी आणि निवडणुकीनंतर लोकप्रतिनिधींची घटनात्मक जबाबदारी यांची जाणीव प्रत्येक नागरिकाला असली पाहिजे. एकात्मिक ज्ञान सिद्धांतातील 'रिकॉन्शिओ' शासनव्यवस्थेच्या संकल्पनेनुसार माहिती स्वीकारणे, तिची चिकित्सक पडताळणी करणे आणि विवेकपूर्ण निर्णय घेणे ही नागरिकांच्या स्वशासनाची प्रक्रिया आहे. लोकभक्ती, ज्ञानभक्ती, कर्मभक्ती, संविधाननिष्ठ नैतिकता आणि कायद्याचे राज्य या तत्त्वांवर आधारित तिरंगा राष्ट्रीय धारणालयाची संकल्पना निवडणूक पारदर्शकतेच्या या मोहिमेशी जोडली पाहिजे, अशी भूमिका ॲड. कारभारी गवळी यांनी मांडली आहे.

## अ.ए.सो.च्या बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेतील बाल आनंद मेळाव्यात लाखोंची उलाढाल



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अ.ए.सो.च्या बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेत दि. २३ व २४ ऑक्टोबर २०२६ या दोन दिवस बाल आनंद मेळावा उत्साहात संपन्न झाला. मेळाव्याचे उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षा मा. सौ. गीता गिल्डा यांच्या शुभहस्ते व अ.ए. सोसायटी सल्लागार श्रीम. मीनाताई बोरा व अ.ए. सोसायटी सल्लागार भूषणजी भंडारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक-विद्यार्थी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान समजावे, लहान वयातच विद्यार्थ्यांना खरेदी विक्री, पैश्यांची देवाण-घेवाण यांचा अनुभव घेता यावा यादृष्टीने एक चांगला उपक्रम अ.ए.सो. ची बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेने राबविला, असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांनी व्यक्त केले.

प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. ज्योती सिसोदिया यांनी आपल्या प्रास्ताविकात बाल आनंद मेळाव्याचा उद्देश सांगितला.

संस्थेच्या प्रमुख कार्यवाह श्रीम. छायाताई फिरोदिया यांनी प्रशालेने राबविलेल्या बालआनंद मेळाव्यास शुभेच्छा देऊन या उपक्रमाचे व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या बाल आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी वेगवगेळ्या प्रकारचे खाद्यपदार्थ, भाजीपाला यांचे एकूण १९३ स्टॉल्स लावले, यावेळी लाखो रुपयांची उलाढाल झाली. या प्रसंगी प्रशालेतील हजारो पालकांनी व विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला. बाल आनंद मेळाव्यातील भुताच्या वाड्यातील नाचणाऱ्या भुतांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री. कांतिलाल खुरंगे व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सौ. सविता शेळके यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रशालेच्या सर्व शिक्षकांनी, पालक व कर्मचारी वृंद यांनी अथक परिश्रम घेतले.

## बौद्ध संस्कार संघातर्फे २५ ऑक्टोबरला वर्षावास समारोप सोहळा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** बौद्ध संस्कार संघ, अहिल्यानगर यांच्या वतीने बौद्धधर्मीय वर्षावास समारोप सोहळ्याचे आयोजन रविवार, २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ ते रात्री ९ या वेळेत चेतना लॉन्स, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर येथे करण्यात आले आहे. या सोहळ्यात धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे, अशी माहिती बौद्ध संस्कार संघाचे भाऊसाहेब देठे यांनी दिली.

वर्षावासाच्या चार महिन्यांच्या कालावधीत 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या पवित्र ग्रंथाचे वाचन व प्रबोधन करण्यात आले. या धार्मिक उपक्रमाच्या समारोप सोहळ्यास भंते धम्मपाल यांची उपस्थिती लाभणार आहे. भगवान गौतम बुद्धांचे विचार, धम्माचे महत्त्व आणि त्यातून मिळणारी मानवतावादी शिकवण यांचा प्रसार या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

या सोहळ्यास वरिष्ठ रिपब्लिकन नेते, समाजभूषण (महाराष्ट्र शासन) पुरस्काराचे निर्माते काकासाहेब खंबाळकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, ते सामाजिक कार्याबाबत मार्गदर्शन करणार आहेत. तसेच सन २०२१-२२ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या समाजभूषण पुरस्काराने गौरविण्यात आलेले समाजभूषण परिमल ज. निकम यांचा पुनश्च सन्मान व गौरव करण्यात येणार आहे. वरिष्ठ रिपब्लिकन चळवळीचे नेते श्रीकांत भालेराव आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अगस्ती बनसोडे यांचीही उपस्थिती असणार आहे.

कार्यक्रमाच्या सांस्कृतिक सत्रात बाल उपासक आणि महिला उपासिका यांच्याकडून भगवान गौतम बुद्धांच्या जीवनावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात येणार आहेत. बुद्धांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग, त्यांची शिकवण आणि सामाजिक समतेचा संदेश या माध्यमातून उपस्थितांसमोर मांडण्यात येणार आहे.

वर्षावास समारोप सोहळ्याच्या आयोजनासाठी विविध संस्था आणि व्यावसायिकांनी प्रायोजक म्हणून सहकार्य केले आहे. यामध्ये ट्रीपवर्स क्युरेशन, जगन्नाथन फुड्स, द केकर्स, न्यू इंडस्ट्रियल प्रॉडक्ट्स, स्मार्ट ड्रेपरी, परिहार व्यसनमुक्ती पुनर्वसन आणि मानसिक आरोग्य केंद्र, मी राजहंस लर्निंग डेव्हलपमेंट अँड थेरपी सेंटर फॉर चिल्ड्रेन, कोहिनूर एज्युकेशन हब, विवा अँड सन्स पेट्रोलियम, महादेव इंजिनिअर्स अँड गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर्स, फोनेक्स इंडस्ट्रीज, हॉटेल सह्याद्री पॅलेस आणि माऊली फुटवेअर यांचा समावेश आहे.

धार्मिक प्रबोधनासोबतच सामाजिक बांधिलकी, समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश देणारा हा वर्षावास समारोप सोहळा होणार असून, बौद्ध बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन बौद्ध संस्कार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

## हमालांच्या मूलभूत सुविधांचे प्रश्न सोडवा; यापुढील निर्णय चर्चेतूनच घेणार - अविनाश घुले

### नवीन रेल्वे मालधक्क्यावरील काम दीड महिन्यानंतर पुन्हा सुरू



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नवीन रेल्वे मालधक्क्यावरील मागील दीड महिन्यांपासून बंद असलेले काम जिल्हा हमालपंचायत, सहाय्यक कामगार आयुक्त आणि हुंडेकरी यांच्यात झालेल्या चर्चेनंतर पुन्हा सुरू झाले. बैठकीत विविध प्रश्नांवर चर्चा करून परस्पर सहमतीने तोडगा काढण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते रेल्वेने माल घेऊन आलेल्या गाडीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर माल उतरविण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली. या निर्णयामुळे हमाल-माथाडी कामगार, मुकादम आणि हुंडेकरी यांच्यासह मालधक्क्याशी संबंधित घटकांना दिलासा मिळाला आहे. जिल्हा हमालपंचायतीच्या माध्यमातून सर्व संबंधितांना एकत्र आणून हा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. मागील दीड महिन्यांपासून काम बंद असल्यामुळे कामगारांच्या रोजगारावर परिणाम झाला होता, तसेच मालधक्क्याशी संबंधित व्यावसायिकांचेही नुकसान होत होते. त्यामुळे कामकाज पुन्हा सुरू करण्यासाठी सर्वांनी चर्चेच्या माध्यमातून मार्ग काढण्याची भूमिका घेतली. सहाय्यक कामगार आयुक्त रेवणनाथ भिसले यांच्या उपस्थितीत झालेल्या चर्चेत कामगारांच्या अडचणी, माल उतरविल्यानंतरची जबाबदारी, कामाचा हिशेब आणि परस्परांमधील कराराच्या अटी यांसारख्या मुद्द्यांवर चर्चा झाली. त्यानंतर काम पुन्हा सुरू करण्याबाबत सहमती झाल्याने मालधक्क्यावरील कामकाज पूर्ववत झाले.

जिल्हा हमालपंचायतीचे अध्यक्ष अविनाश घुले यांनी यावेळी कामगारांच्या प्रश्नांबाबत भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, गेल्या दीड महिन्यांपासून काम बंद असल्यामुळे सर्वांचेच अतोनात नुकसान झाले आहे. हमाल-माथाडी कामगार, मुकादम, हुंडेकरी आणि मालधक्क्याशी संबंधित व्यावसायिक हे एकमेकांवर अवलंबून आहेत. त्यामुळे कोणत्याही एका घटकाचा विचार करून निर्णय घेण्याऐवजी सर्वांच्या हिताचा विचार केला पाहिजे. यापुढे कोणताही प्रश्न निर्माण झाल्यास मुकादम आणि संघटनेच्या प्रतिनिधींनी एकत्र बसून चर्चा करावी आणि त्यातून मार्ग काढावा. परस्परांमध्ये समन्वय राहिल्यास कामकाज बंद ठेवण्याची वेळ येणार नाही. नवीन रेल्वे मालधक्क्यावर काम करणाऱ्या हमाल-माथाडी कामगारांना आवश्यक त्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. मालधक्क्यावर कामगारांसाठी छताची व्यवस्था, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा आणि स्वच्छ शौचालय उपलब्ध करून देण्यात यावे. कामगारांना कामाच्या ठिकाणी आवश्यक सुविधा मिळाल्यास त्यांना चांगल्या वातावरणात काम करता येईल. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने निर्णय घ्यावा. 'मालक जगले तर आम्ही जगणार, ही रथाची दोन चाके आहेत,' असे सांगत घुले यांनी कामगार आणि व्यावसायिकांचे हित एकमेकांशी जोडलेले असल्याचे स्पष्ट केले. तसेच या येथे काम करणारे २० मुकादमाच्या टोळी पैकी १८ टोळींनी हमाल पंचायत चे नेतृत्व मान्य केले आहे सुमारे ५५० कामगार हे अविनाश घुले यांच्या नेतृत्वाखाली काम करत आहे तसेच कामगारांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष न करता सर्वांनी एकमेकांना सहकार्य करावे आणि भविष्यातील प्रश्न चर्चेतूनच सोडवावेत, असे आवाहनही घुले त्यांनी केले.

सहाय्यक कामगार आयुक्त रेवणनाथ भिसले यांनीही कामगारांच्या मागण्यांबाबत रेल्वे प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. रेल्वे प्रशासनाने हमाल-माथाडी कामगारांच्या मागण्यांचा लवकरात लवकर विचार करून त्यांना आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी त्यांनी केली. कामगारांना कामाच्या ठिकाणी मूलभूत सुविधा मिळणे आवश्यक असून, त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी संबंधित प्रशासनाने पुढाकार घ्यावा, असे त्यांनी सांगितले. बैठकीत माल उतरविल्यानंतर मालाच्या जबाबदारीबाबतही चर्चा करण्यात आली. ठरलेल्या अटींनुसार माल उतरविल्यानंतर त्याची जबाबदारी कामगारांवर राहणार नसल्याचा मुद्दा मांडण्यात आला. माल चोरीला जाणे, गहाळ होणे किंवा मालाच्या प्रमाणात तफावत आढळणे अशा बाबींमध्ये जबाबदारी निश्चित करताना स्पष्टता असावी, यावर भर देण्यात आला. तसेच मुकादमांनी कामाचा हिशेब व्यवस्थित ठेवावा आणि कामकाजात पारदर्शकता राखावी, असेही ठरविण्यात आले. मालधक्क्यावरील कामकाजात गैरसमज निर्माण होऊ नयेत आणि माल उतरविल्यानंतर जबाबदारीवरून वाद उद्भवू नयेत, यासाठी सर्व संबंधितांनी ठरलेल्या अटींचे पालन करावे, अशी भूमिका बैठकीत मांडण्यात आली.

बैठकीत आगरकर मळा, अहिल्यानगर येथील हुंडेकरी आणि माथाडी मुकादम यांच्यात झालेल्या मंजुरी करारासंदर्भातील मुद्द्यावरही चर्चा झाली. संबंधित कराराच्या अटी आणि लागू कालावधी याबाबत चर्चा करून ठरलेल्या तरतुदींनुसार कामकाज करण्यावर भर देण्यात आला. बैठकीत दोन्ही बाजूंमध्ये योग्य तो समझोता झाल्याने परस्परांमध्ये तक्रारी राहणार नसल्याचे नमूद करण्यात आले. यापुढे कामकाज करताना परस्परांमध्ये समन्वय राखणे आणि कोणताही वाद निर्माण झाल्यास तो चर्चेतून सोडविणे, यावर सहमती झाली. जिल्हा हमालपंचायतीच्या माध्यमातून सर्व संबंधित घटकांना एकत्र आणून प्रश्न सोडविण्यात आल्याने काम पुन्हा सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला. काम बंद असल्यामुळे रोजगार आणि आर्थिक व्यवहारांवर परिणाम झाला होता. आता कामकाज पुन्हा सुरू झाल्याने संबंधितांना दिलासा मिळाला आहे. मात्र, कामगारांच्या मूलभूत सुविधांचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा असून, त्याबाबत रेल्वे प्रशासनाने लवकर निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. कामगारांच्या हिताचे रक्षण करतानाच मालधक्क्यावरील कामकाज नियमित सुरू राहावे, यासाठी सर्व घटकांनी सहकार्य करणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

यावेळी करीमभाई हुंडेकरी आणि रमाकांत गाडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

## फख्र-ए-निस्वां अवॉर्ड २०२६'ने गुणवंत महिलांचा गौरव!

### ऑल इंडिया उलमा बोर्डाच्या वतीने महाराष्ट्र महिला संमेलन; शिक्षण, स्वावलंबन आणि महिला सक्षमीकरणाचा संदेश




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** महिलांचा सन्मान, शिक्षण आणि स्वावलंबन हाच सशक्त व प्रगत समाजाचा पाया असल्याचा संदेश देत ऑल इंडिया उलमा बोर्ड (रजि.), वूमेंस विंगच्या वतीने तळोजा फेज-१ व फेज-२ येथे ऑल महाराष्ट्र वूमेंस कॉन्फरन्स आणि 'फख्र-ए-निस्वां अवॉर्ड २०२६' या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यात शिक्षण, वैद्यकीय सेवा, व्यवसाय आणि सामाजिक कार्य अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या गुणवंत महिलांचा सन्मान करण्यात आला.

**महिला सक्षमीकरणाला नवी दिशा**

महिलांच्या कर्तृत्वाला व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या प्रतिभेला प्रोत्साहन देणे आणि शिक्षण व स्वावलंबनाच्या माध्यमातून प्रगतीच्या संधी निर्माण करणे, हा संमेलनाचा प्रमुख उद्देश होता. यावेळी आयोजित प्रेरणादायी सत्रातून महिला शिक्षण, आत्मविश्वास, स्वावलंबन आणि समाजाच्या विकासातील महिलांची भूमिका याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. महिलांना स्वतः च्या क्षमतेची जाणीव करून देत सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक क्षेत्रांत पुढे जाण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले.

मान्यवरांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढली

या कार्यक्रमाला ऑल इंडिया उलमा बोर्डाचे (रजि.) राष्ट्रीय महासचिव अंज़र अनवर खान, मुंब्रा येथील नगरसेविका सहर युनूस शेख, तळोजा येथील नगरसेविका शोषी नागी, रजनी मॅडम आणि पाटील मॅडम,यास्मीन मॅडम यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या उपस्थितीत महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यात आला. या उपक्रमामुळे महिला सक्षमीकरण आणि सामाजिक प्रगतीचा संदेश अधिक प्रभावीपणे पोहोचला.

रायगड जिल्ह्यात संघटनात्मक विस्तार; नवीन नियुक्त्या जाहीर

ऑल इंडिया उलमा बोर्डाचे सामाजिक कार्य अधिक व्यापक करण्यासाठी तसेच शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि युवकांच्या विकासाला चालना देण्यासाठी संमेलनादरम्यान विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या.

ॲड. शफीक सय्यद- रायगड जिल्हाध्यक्ष, सोशल विंग कुलसुम शेख - रायगड जिल्हाध्यक्ष, वूमेन्स विंग

शहनवाज शेख - स्टुडंट विंग अध्यक्ष सामिया सय्यद - नवी मुंबई स्टुडंट्स विंग अध्यक्ष

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी संघटनेच्या माध्यमातून शिक्षणाचा प्रसार, महिला सक्षमीकरण, युवकांना योग्य मार्गदर्शन आणि विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या नियुक्त्यांमुळे रायगड जिल्हा आणि नवी मुंबई परिसरातील संघटनात्मक कार्याला अधिक गती मिळण्याची अपेक्षा आहे.

## कराओके असोसिएशनची नगरमध्ये स्थापना

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व कलाकारांच्या हितासाठी व त्यांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी कराओके असोसिएशन ऑफ आर्टिस्ट फॉर म्युझिक या राज्यस्तरीय संस्थेच्या अहिल्यानगर शाखेची नुकतीच स्थापना करण्यात आली.

कराओके असोसिएशन ऑफ आर्टिस्ट फॉर म्युझिक, (काम) ही राज्यस्तरीय संस्था असून यात अध्यक्ष राजकुमार तिखे, वैजू चांडवले, आरती दीक्षित, प्रकाश सावंत इत्यादी सुप्रसिद्ध गायक कलाकार कार्यकारणी सदस्य आहेत. राज्यभरातील कलाकारांना एकाच प्लॅटफॉर्मवर आणून त्यांच्या अडीअडचणी दूर करून त्यांना योग्य मार्गदर्शन करणे, शासकीय योजनांची त्यांना माहिती देणे, स्पर्धांचे आयोजन करणे इत्यादी उद्दिष्टे या संस्थेची आहेत. अहिल्यानगर शाखेची स्थापना करताना नगर मधील ऋणानुबंध संस्थेचे अध्यक्ष अजित रोकडे यांचे काम संस्थेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी नेमणूक करण्यात आली. नुकतीच अहिल्यानगर मध्येही या संस्थेची सभा होऊन जिल्ह्यासाठी कार्यकारिणी तयार करण्यात आली . अहिल्यानगर मधील सुप्रसिद्ध गायक डॉक्टर दमन काशीद यांची आणि प्रशांत बंडगर यांची उपाध्यक्ष म्हणून




निवड करण्यात आली तर सारिका रघुवंशी यांची कार्यकारी उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. आर्किटेक्ट व अनाम प्रेमचे अजित माने यांची सचिव तर सचिन परदेशी यांची खजिनदार म्हणून नियुक्ती करण्यात आली. डॉक्टर शैलेंद्र खंडागळे व वैदेही बल्लाळ यांची संघटक पदी निवड करण्यात आली. नगर मधील सुप्रसिद्ध गायक अजय दगडे,जुबेर शेख व आबीद खान यांची मार्गदर्शक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

या सभेत बोलताना अध्यक्ष अजित रोकडे म्हणाले की प्रशासनाकडून सर्व कलाकारांना नाट्यगृह व इतर सोयी सुविधा मिळवण्यासाठी पाठपुरावा केला जाणार आहे तसेच कलाकारांच्या आर्थिक सामाजिक आणि कौटुंबिक जीवनात येणाऱ्या अडी अडचणी सोडवण्यासाठी ही संस्था पाठबळ देण्याचा प्रयत्न करणार आहे. कलाकारांना तज्ञांकडून मार्गदर्शन,विविध कार्यक्रमांचे आयोजन,कलाकारांना विमा संरक्षण आणि शासकीय योजनांचा लाभ इत्यादी बाबींसाठी संस्था कार्यरत राहणार आहे. याप्रसंगी डॉक्टर दमन काशीद, अजित माने,प्रशांत बंडगर,अजय दगडे, डॉक्टर शैलेंद्र खंडागळे, वैदेही बल्लाळ, अबीद खान यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

अहिल्या नगर जिल्ह्यातील गायक वादक नृत्य कलाकारांना संस्थेचे सभासद होण्यासाठी अध्यक्ष अजित रोकडे यांनी आवाहन केले आहे. व सभासद फॉर्म प्राप्त करण्यासाठी मोबाईल क्रमांक ९४ २० ६३ ५० ९६ आणि ९४ २२ २२ ०१२३ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### कवितेतून पर्यावरण जागृतीचा निमगाव वाघात जागर



अहिल्यानगर- नवरात्र उत्सवाला सामाजिक प्रबोधनाची जोड देत नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे कवितेच्या माध्यमातून पर्यावरण जागृती करण्यात आली. प्लास्टिकचा वाढता वापर, सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता आणि पर्यावरणापुढील विविध आव्हाने यांविषयी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी काव्याच्या माध्यमातून स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून देण्यात आले. धार्मिक उत्सवाच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून पर्यावरण रक्षणाचा संदेश ग्रामस्थांपर्यंत पोहोचविण्यात आला.जिल्हा परिषदेच्या 'नवरात्री स्वच्छता उत्सव' या उपक्रमांतर्गत स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या वतीने गावात नवरात्रोत्सवानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात कवी रुपचंद शिदोरे यांनी आपल्या कवितांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, प्लास्टिकमुक्ती आणि सार्वजनिक स्वच्छतेचा संदेश दिला. कवितांच्या प्रभावी सादरीकरणातून दैनंदिन जीवनात स्वच्छतेचे महत्त्व काय आहे, सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी कशी आहे आणि प्लास्टिकच्या अतिवापरामुळे पर्यावरणावर कोणते दुष्परिणाम होतात, याविषयी जनजागृती करण्यात आली. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी केवळ शासकीय यंत्रणांवर अवलंबून न राहता प्रत्येकाने आपल्या स्तरावर प्रयत्न करणे आवश्यक असल्याचा विचार या उपक्रमातून मांडण्यात आला. स्वच्छता ही केवळ एका दिवसापुरती मर्यादित न राहता ती प्रत्येकाच्या जीवनशैलीचा भाग बनली पाहिजे. गावातील रस्ते, सार्वजनिक ठिकाणे आणि परिसर स्वच्छ ठेवणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे तसेच पर्यावरणपूरक सवयी अंगीकारणे, या बाबींचे महत्त्व ग्रामस्थांना लक्षात आणून देण्यात आले.या उपक्रमावेळी स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. पै. डोंगरे यांनी स्वच्छता व पर्यावरण संवर्धन काळाची गरज बनली आहे. नैसर्गिक संकट व दुष्काळाला तोफ्लड देण्यासाठी पर्यावरणाचे रक्षण कर्तव्य म्हणून करावे लागणार असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा परिषदेच्या 'नवरात्री स्वच्छता उत्सव' उपक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या या जनजागृतीपर कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी आणि जल जीवनचे प्रकल्प संचालक राजेंद्र देसले यांचे मार्गदर्शन लाभले.

### माया दुधाडे यांचे निधन



अहिल्यानगर - वांबोरी (ता. राहुरी) येथील सामाजिक कार्यकर्ते व नाभिक समाज बांधव अरुण दादा दुधाडे यांच्या पत्नी सौ. माया अरुण दुधाडे यांचे नुकतेच निधन झाले. मृत्यूसमयी त्यांची वय ४९ वर्षे होते. त्यांच्या पक्षात पती, मुलगा, मुलगी, पुतणे, दिर, नातू असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल या छोटाशा रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर- ॲड. प्रमोद मेहेर

**स्त्री रोग व गर्भवती महिला आरोग्य तपासणी शिबिरास उस्फूर्त प्रतिसाद १०८ रुग्णांची तपासणी**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या उभारणीच्या काळापासूनच मी या सेवा कार्यात जोडला गेलो आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलचा संकल्प ज्यावेळेस केला होता. त्यावेळी हॉस्पिटलला यश मिळेल का हा प्रश्न सर्वांना पडलेला होता.परंतु आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांच्या नावाने हॉस्पिटल ची सुरुवात केली.तसेच जैन सोशल फेडरेशनचे सर्व सदस्य अत्यंत तळमळीने व सेवाभावी वृत्तीने आरोग्य सेवेच्या कार्यात योगदान देत असल्याने आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या छोटासा रोपट्याचे रूपांतर वटवृक्षात झाले आहे.आचार्य गुरुदेव आनंदऋषीजी म.सा.यांच्या आशीर्वादाने सुरू झालेले आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये ''मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा'' आहे.हे समजून आरोग्यसेवा दिली जात आहे.

आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून गोरगरीब रुग्णांची सेवा घडत आहे.या मोफत आरोग्य शिबिरात मेहेर परिवाराला आनंदऋषीजी हॉस्पिटलमधील शिबिराचे माध्यमातून सेवा करण्याची भाग्य मिळाले आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटल ची कीर्ती सर्व दूर पसरली आहे.असे प्रतिपादन

ॲड.प्रमोद मेहेर यांनी केले आहे.

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये स्त्री रोग व गर्भवती महिला आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन स्व.कमलबाई कांतीलाल मेहेर यांच्या स्मरणार्थ शिबिराचे उद्घाटन ईश्वरलाल मेहेर,ॲड.प्रमोद मेहेर,मनोज मेहेर यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले.याप्रसंगी प्रशांत मेहेर,ॲड. सिद्धेश मेहेर,डॉ. अरविंद गुगळे,सौ.वंदना मेहेर, सौ.अंजली मेहेर,सौ.शैलजा गुगळे,सौ.संध्या मेहेर, सौ.पलक मेहेर,डॉ. रोहित गुगळे,डॉ.सपना गुगळे,चेतन गुगळे,सौ.कृष्णा पितळे आदींसह जैन सोशल फेडरेशनचे डॉ.वसंत कटारिया,संतोष बोथरा, सुभाष मुनोत,डॉ.आशिष भंडारी,प्रकाश छल्लाणी,वसंत चोपडा शिबिराचे तज्ञ डॉ.रवींद्र मुथा,डॉ.तृप्ती पाटील,डॉ. प्रथमेश झेंडे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले,कांतीलाल मेहेर यांनी गुरुदेव आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांची सेवा केली आहे.त्यांनी वाचनालयातील धार्मिक पुस्तकांचा अनमोल ठेवा सांभाळला.त्यांनी मेहेर परिवारावर केलेले धार्मिक संस्कारातून च मेहेर परिवार हा धार्मिक कार्याशी जोडला गेला आहे.तसेच ॲड.

प्रमोद मेहेर यांनी हॉस्पिटलच्या प्रशासकीय कार्यामध्ये वेळोवेळी सहकार्य केले आहे.हॉस्पिटलच्या उभारणीच्या काळात त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले आहे.

मेहेर परिवारासारखे अनेक परिवार आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या कार्यात योगदान देत असल्याने वर्षभर विविध आरोग्य शिबिरे रुग्णांसाठी भरविले जात आहेत. झोपडपट्टी,विणकर कामगार व बांधकाम कामगार करणाऱ्या गर्भवती महिला येथे उपचारासाठी येत असतात.कुपोषित बाळ जन्माला येऊ नये.यासाठी आरोग्य शिबिरांच्या मार्फत मार्च व ऑगस्ट दरम्यान मोठ्या प्रमाणात शिबिरे घेतली जातात.या शिबिराचा लाभ पाच ते सहा हजार रुग्ण घेतात.''समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत रुग्णसेवा मिळावी'' हे आचार्य आनंदऋषीजी महाराजांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जैन सोशल फेडरेशन चे सर्व सदस्य कार्यरत आहेत.

डॉ.प्रथमेश झेंडे म्हणाले,या शिबिरामध्ये स्त्री रोग व गर्भवती महिलांची मोफत तपासणी करण्यात येते. तसेच वंधत्व असणाऱ्या महिलांना ही या शिबिराच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात येते.कुपोषित बालके जन्माला येऊ नयेत.

# 'जागर आरोग्याचा मुख्यमंत्री आरोग्य संवाद' उपक्रमातून विद्यार्थिनींमध्ये आरोग्याविषयी जागृती

**संतुलित आहार, योग्य दिनचर्या आणि आरोग्याची काळजी हाच निरोगी जीवनाचा पाया –डॉ. श्रद्धा असोपा**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** युवकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण व्हावी, तसेच आयुर्वेदाच्या माध्यमातून निरोगी जीवनशैलीचे महत्त्व समजावे, या उद्देशाने सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या डॉ. एन. जे. पाऊलबुधे शिक्षणशास्त्र महाविद्यालयात 'जागर आरोग्याचा मुख्यमंत्री आरोग्य संवाद' या उपक्रमांतर्गत युवकांचे आरोग्य या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. डॉ. एन. जे. पाऊलबुधे आयुर्वेद महाविद्यालयाच्या प्राध्यापक डॉ. श्रद्धा असोपा यांनी विद्यार्थिनींना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयीन युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून विद्यार्थिनींना आरोग्याचे महत्त्व पटवून देण्याबरोबरच दैनंदिन जीवनात आरोग्यदायी सवयींचा अंगीकार करण्याचा संदेश देण्यात आला. बदलती जीवनशैली, आहाराच्या सवयी आणि आरोग्याबाबतची जागरूकता या बाबी युवकांच्या जीवनात महत्त्वपूर्ण असल्याने त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे, हा या व्याख्यानामागील प्रमुख उद्देश होता.

डॉ. श्रद्धा असोपा यांनी आपल्या व्याख्यानातून आरोग्याची काळजी घेण्याचे महत्त्व विशद केले. संतुलित आहार, नियमित दिनचर्या आणि निरोगी जीवनशैली यांचा आरोग्यावर होणारा परिणाम त्यांनी विद्यार्थिनींना समजावून सांगितला. आयुर्वेदाच्या दृष्टिकोनातून आरोग्याचे महत्त्व स्पष्ट करताना दैनंदिन जीवनात आरोग्यपूरक सवयी अंगीकारणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. केवळ आजार झाल्यानंतर उपचार घेण्याऐवजी आरोग्य जपण्याला प्राधान्य देणे गरजेचे असल्याचा संदेश या व्याख्यानातून देण्यात आला.

आयुर्वेदविषयक ज्ञानाचा प्रसार करणे आणि समाजामध्ये आयुर्वेदाबाबत योग्य दृष्टिकोन निर्माण करणे, या उद्देशाने डॉ. असोपा यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींना आरोग्यविषयक माहिती मिळण्यासोबतच स्वतःच्या आरोग्याप्रती सजग राहण्याची माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष विनयनाथ पाऊलबुधे, संचालक साई पाऊलबुधे, उपाध्यक्ष रामभाऊ बुचकुल, सहसचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे आणि तज्ज्ञ संचालक डॉ. रेखी खुराना यांचे मार्गदर्शन लाभले. महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुचित्रा डावरे, रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य संदीप कांबळे, अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्य सविता सानप तसेच विनायक मच्चा यांची यावेळी आवर्जून उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्राची मचे, प्राध्यापकवृंद आणि कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# मनसेचे शहर सचिव डॉ. संतोष साळवे यांची विनयभंगाच्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहर सचिव डॉ. संतोष यशवंत साळवे यांची विनयभंगाच्या गुन्ह्यातून न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. अहिल्यानगर येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, येथे या खटल्याची सुनावणी झाली. न्यायालयाने डॉ. साळवे यांची निर्दोष मुक्तता केल्याने त्यांना या प्रकरणात मोठा दिलासा मिळाला आहे.

डॉ. संतोष साळवे यांच्याविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाची नियमित सुनावणी झाली. पुराव्याअभावी व न्यायालयीन कागदपत्रांनुसार, या खटल्याचा निकाल २१ ऑक्टोबर २०२६ रोजी जाहीर करण्यात आला. या खटल्यात डॉ. संतोष साळवे यांच्या वतीने ॲड. संदीप बुरके यांनी कामकाज पाहिले. त्यांना ॲड रत्नाकर मधाळे,ॲड. सौरभ सानप आणि यांनी सहकार्य केले. न्यायालयीन प्रक्रियेत बचाव पक्षाची योग्य बाजू मांडण्यात आली.

डॉ. संतोष साळवे यांची निर्दोष मुक्तता झाल्याची माहिती समोर आल्यानंतर या प्रकरणाची चर्चा सुरू झाली आहे. न्यायालयाच्या निकालामुळे त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# वंचितांना आधार देणाऱ्या कार्याचा सन्मान; डॉ. उद्धव शिंदे यांचा गौरव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांचा दिव्य दृष्टी फौंडेशन आणि शोभा सर्वोदय फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गौरव करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयातील पंडित जवाहरलाल नेहरू सभागृहात झालेल्या कार्यक्रमात ब्रिगेडिअर राजीव चावला यांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.

डॉ. शिंदे हे स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या माध्यमातून रक्तदान, आरोग्यसेवा, शैक्षणिक मदत, पर्यावरण संवर्धन, महिला सक्षमीकरण तसेच गरजू, अनाथ आणि दिव्यांग व्यक्तींना मदत अशा विविध उपक्रमांत सक्रिय योगदान देत आहेत. समाजातील वंचित घटकांना आधार देण्याच्या त्यांच्या कार्याची दखल घेऊन हा सन्मान करण्यात आला. यावेळी धनश्री विखे पाटील, उद्योजक नरेंद्र फिरोदिया, वरिष्ठ डाक अधीक्षक विकास पालवे, पोलीस उपअधीक्षक शिरीष वमने, हरजितसिंघ वधवा आणि दिव्य दृष्टी फौंडेशनचे कृष्णा तवले आदी मान्यवर उपस्थित होते. सन्मानाला उत्तर देताना डॉ.



उद्धव शिंदे म्हणाले, ''गरजू व्यक्तींच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलवण्यातच सामाजिक कार्याचा खरा आनंद आहे. वंचितांना मुख्य प्रवाहात आणणे आणि युवकांमध्ये सामाजिक बांधिलकी रुजवणे, हे आमच्या कार्याचे उद्दिष्ट आहे. हा सन्मान माझा वैयक्तिक नसून स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या माध्यमातून समाजासाठी कार्य करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचा आहे. या गौरवामुळे सामाजिक क्षेत्रात अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळाली आहे.

# नॅशनल मिक्स-बॉक्सिंग रेफरी सेमिनार पुणे येथे संपन्न



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** इंडियन मिक्स बॉक्सिंग फेडरेशन यांच्या मान्यतेने दिनांक ११ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेली ''नॅशनल मिक्स बॉक्सिंग रेफरी सेमिनार २०२६'' अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात देवू फाटा, आळंदी माऊली हॉल, पुणे येथे यशस्वीरित्या पार पडली.

या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. उर्मिला जाधव (प्राचार्य, ज्ञानभक्ती इंटरनॅशनल स्कूल, दुदुळगाव), भारतीय मिक्स बॉक्सिंग महासंघाचे संस्थापक व महासचिव श्री. राकेश म्हसकर, प्रमुख पाहुण्या सौ. अंजलीताई दळवी, उपाध्यक्ष मुश्ताक हुसेन, सचिव सुब्रमण्यम एम. पी., सचिव सुदर्शन सी. एन., सत्या दवे, टेक्निकल डायरेक्टर व परीक्षक सज्जाद भट, सहसचिव राजू चौरागडे, सदस्य नानक राम, महाराष्ट्र राज्य मिक्स-बॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष प्रशांत मोहिते, महाराष्ट्राचे महासचिव नारायण कराळे, मुख्य परीक्षक विनायक सकपाळ, मुकेश भगत यांच्या हस्ते करण्यात आले. आयोजक म्हणून मिक्स बॉक्सिंग पिंपरी-चिंचवड असोसिएशनचे अध्यक्ष निवृत्ती काळभोर व महाराष्ट्राचे महासचिव नारायण कराळे आणि सूत्रसंचालक रविराज गाडवे यांनी उत्कृष्ट काम पाहिले. या सेमिनारमध्ये महाराष्ट्र, दिल्ली, जम्मू-काश्मीर, आसाम, मणिपूर, ओडिशा, मध्य प्रदेश, गुजरात, कर्नाटक, तेलंगणा, केरळ अशा १२ राज्य असोसिएशनच्या रेफरींनी सहभाग घेतला.

रेफरी ट्रेनिंग आणि लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेले रेफरी: महाराष्ट्र (४०): मुकेश भगत, प्रणाली पाटील, रोहन शेवाळे, योगेश पाटील, हितेश भगत, योगेश वारगुडे, संजय सकपाळ, सिद्धी सकपाळ, श्रेयश म्हसकर, सुबोध शिंदे, उत्कर्ष घाणेकर, पूजा श. गोलिपकर, तन्वी मानकर, दृती लाड, विधाही पाटील, स्वप्नील सोनावणे, विनोद पी. दाढे , आराधना एस. निवळे, योगेंद्र नामदेव, डॉ. रवी बारापात्रे, गणेश पेरे, शशिकांत नवगिरे, सुंदर नवगिरे, प्रदीप होंडे, सिद्धेश यादव, सुशांत उडाणे, अभिजित कुलकर्णी, निवृत्ती काळभोर, आशितोष दौंडकर, प्रवीण शिंदे, अंजली वटी, विनय चव्हाण, निलिमा नायडू, अस्मिता सावंत, वैशाली कपोते, कल्याण व्ही. देशपांडे, शशिकला चव्हाण. नारायण कराळे,मनोज घेरे ,राजु चौवरागडे. आसाम (३): हर्ष सोनार, निरंजन गोगोई, अमरजित बोराहकेरळ (७): युसुफ, सुजित, आदर्श, जोमोन, धनु श्री, स्वामीधनकर्नाटक (९): चंद्रू डी, अंबरीश एन, कार्तिक एन, हरीश आर, जेबामनी ए, होन्नागंगाप्पा, खात्री बेलचडा, मधु एम. व्ही, ओम शंकरगुजरात (७): सत्या ए. दवे, धवल जे. अध्वर्यू, अमितसिंह पटेल, मो. युसूफ मुलतानी, जय चाहवाला, भारतीय एस. ठाकोर, अझीझ झवेरीओडिशा (४): सचिन महंता, बालाजी घडेई, उमाकांत बेहरा, पवन कुमारमणिपूर (४): मो. रफी, मोइरांगथेम एन. सिंग, मो. मनेरुद्दीन, मो. वाहिदुर रहमानमध्य प्रदेश (८): उज्ज्वल शुक्ल, कपिल श्याम, खाना गर्ग, चंद्रशेखर यादव, ओम द्विवेदी, गीतांजली गुप्ता, विशाल जहजपुरिया, अंशुमन सिंग दिल्ली (१): अनिता वर्माजम्मू-काश्मीर (२): मुहम्मद युनिस, सज्जाद बट मान्यवरांचे मनोगत:यशस्वी आयोजनाबद्दल पिंपरी-चिंचवड असोसिएशनचे अध्यक्ष निवृत्ती काळभोर, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष प्रशांत मोहिते, महाराष्ट्राचे महासचिव नारायण कराळे व भारतीय महासंघाचे चेअरमन डॉ. शरद पुंदे यांनी सर्वांचे आभार मानले.याप्रसंगी संस्थापक महासचिव श्री. राकेश म्हसकर म्हणाले, ''भविष्यातही अशाच दर्जेदार स्पर्धा व प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करून मिक्स बॉक्सिंगला सरकारी मान्यता मिळवण्यासाठी सातत्याने त्याचे नाव घेण्यात येणार आहे .'' उत्तीर्ण झालेल्या सर्व रेफरींचे भारतीय मिक्स बॉक्सिंग महासंघाच्या राष्ट्रीय अध्यक्षा मा. आदितीताई तटकरे (कॅबिनेट मंत्री - महिला व बाल विकास) , संस्थापक महासचिव राकेश म्हसकर, व महाराष्ट्र राज्य असोसिएशनचे अध्यक्ष मा. अनिकेत भाई तटकरे (आमदार) यांनी मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# कारखाने सुरू; पण शेतात ऊसच कमी!

**पावसाअभावी आणि वेळेवर पाणी न मिळाल्याने उसाची वाढ खुंटली; पैठण तालुक्यात ऊस उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण तालुक्यात यंदाच्या गळीत हंगामासाठी साखर कारखाने सुरू झाले असले, तरी शेतात अपेक्षित प्रमाणात ऊस उपलब्ध होणार का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने आणि सिंचनासाठी वेळेवर पाणी उपलब्ध न झाल्याने अनेक भागांत उसाची वाढ खुंटली आहे. परिणामी उसाचे उत्पादन घटण्याची शक्यता असून, ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडण्याची भीती व्यक्त होत आहे.



पैठण तालुक्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या खर्चातून उसाची लागवड केली. मशागत, बियाणे, खते, औषधे, मजुरी आणि पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांनी हजारो रुपये खर्च केले. मात्र, यंदा पावसाने अपेक्षित साथ दिली नाही. त्यातच सिंचनासाठी पुरेसे पाणी वेळेवर मिळाले नसल्याने उसाची अपेक्षित वाढ झाली नाही. अनेक ठिकाणी ऊस पिकाची उंची, जाडी आणि वाढीवर परिणाम झाल्याचे चित्र आहे.

**खर्च वाढला; उत्पादन घटण्याची भीती**

ऊस हे दीर्घ कालावधीचे आणि मोठ्या भांडवली खर्चाचे पीक आहे. लागवडीपासून तोडणीपर्यंत शेतकऱ्यांना सातत्याने खर्च करावा लागतो. मात्र, पावसाची कमतरता आणि पाण्याचे अनियमित नियोजन यामुळे उसाच्या वाढीवर परिणाम झाला आहे. अपेक्षित उत्पादन मिळाले नाही, तर केलेला खर्चही भरून निघणे कठीण होणार आहे. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत.

**कारखाने सुरू, मग पुरेसा ऊस कुठून येणार?**

साखर कारखान्यांचा गळीत हंगाम सुरू झाला असला, तरी शेतातील उसाची वाढ खुंटल्याने आगामी काळात ऊस पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. ऊस तोडणीचे नियोजन, वाहतूक आणि कारखान्यांना होणारा पुरवठा यावरही त्याचे परिणाम जाणवू शकतात. उसाचे उत्पादन कमी झाल्यास त्याचा थेट फटका शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला बसणार आहे.

**सिंचनाच्या नियोजनाकडे लक्ष देण्याची गरज**

पैठण तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सिंचनाच्या पाण्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. उपलब्ध पाण्याचे शेतीसाठी वेळापत्रकानुसार वितरण, पाणीपुरवठ्यातील अडचणी दूर करणे आणि दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना मदत करणे गरजेचे आहे. अन्यथा मोठा खर्च करूनही अपेक्षित उत्पादन न मिळाल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट अधिक गडद होण्याची भीती आहे. एकीकडे साखर कारखान्यांची धुराडी पेटली, तर दुसरीकडे पाण्याअभावी शेतातील उसाची वाढ खुंटली. त्यामुळे यंदाच्या गळीत हंगामात ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या पदरी किती उत्पन्न पडणार, हा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# ‘झाडे लावा, पृथ्वी वाचवा’चा संदेश देत कर्म फाउंडेशनचा ‘लक्ष्य १००० वटवृक्ष’ संकल्प

**| नगरच्या तरुणांचाआळंदीच्या चिंबळी डोंगरावर ‘माऊलीवन’ साकारण्याचा उपक्रम; दहा वर्षांत ७४७ वडांची लागवड व संवर्धन**

**| कमी पाण्यात वटवृक्ष जगविण्याचा अभिनव प्रयोग; ६५ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग**

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ‘झाडे लावा, झाडे जगवा’ या ब्रीदवाक्याऐवजी आता ‘झाडे लावा, पृथ्वी वाचवा’ हा संदेश प्रत्येकाच्या मनामनात रुजविण्याची वेळ आली आहे. पृथ्वी आणि मानवजात आज गंभीर वळणावर येऊन ठेपली असताना पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व ओळखून अहिल्यानगरमधील तरुण प्रा. मयूर कांगणे यांनी २०१६ मध्ये ‘लक्ष्य १००० वटवृक्ष’ हा संकल्प केला. या संकल्पाच्या पूर्ततेसाठी मित्र-मैत्रिणी, समाजातील निसर्गप्रेमी आणि विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ एकत्र आले. त्यांच्या सामूहिक प्रयत्नांतून कर्म फाउंडेशनच्या माध्यमातून दहा वर्षांत ७४७ वटवृक्षांची लागवड करून त्यांचे संवर्धन करण्यात आले आहे.

केवळ वडाची झाडे लावणे एवढाच मर्यादित उद्देश न ठेवता, त्यांची योग्य काळजी घेऊन ती स्वयंभू होईपर्यंत त्यांचे संगोपन करणे, हा व्यापक दृष्टिकोन कर्म फाउंडेशनने स्वीकारला आहे. याच संकल्पाचा विस्तार करत फाउंडेशनच्या वतीने श्रीक्षेत्र आळंदी येथील चिंबळी डोंगरावर ‘माऊलीवन’ साकारण्यात येत आहे. या परिसरात संपूर्ण नैसर्गिक परिसंस्था निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. माऊलीवनातील वृक्षारोपण उपक्रमांतर्गत जुलै महिन्यात ३१, ऑगस्ट महिन्यात ३४, तर नुकत्याच झालेल्या उपक्रमात ४३ वटवृक्षांची स्थापना करण्यात आली. अशा प्रकारे एकूण १०८ भव्य वटवृक्ष या परिसरात लावण्यात आले आहेत. या वटवृक्षांची उंची १२ ते १४ फूट असून, त्यांच्या माध्यमातून परिसरात नैसर्गिक हरितक्षेत्र



विकसित करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

वटवृक्षांची स्थापना करताना कर्म फाउंडेशनच्या टीमकडून विशेष पद्धतीचा वापर केला जातो. झाड लावण्यासाठी तयार केलेल्या खड्ड्यात सर्वप्रथम नारळाच्या शेंड्यांचा थर टाकला जातो. त्यानंतर दीड फुटी पीव्हीसी पाईप बसवून वटवृक्षाची स्थापना केली जाते. उन्हाळ्यात झाडांना पाणी देताना या पाईपचा वापर केला जातो. पाईपमधून सोडलेले पाणी नारळाच्या शेंड्यांमध्ये साठून राहते. या शेंड्या छोट्या जलसाठ्याप्रमाणे काम करतात. त्यामुळे पाण्याचा अपव्यय टाळून कमी पाण्यातही झाडे जगविणे शक्य होते. कर्म फाउंडेशनच्या टीमने हा प्रयोग यशस्वी करून दाखविला आहे.

उपक्रमाच्या सांगतेप्रसंगी कर्म फाउंडेशनचे सदस्य आणि प्रसिद्ध व्याख्याते गणेश शिंदे यांनी उपस्थितांशी संवाद साधला. ते म्हणाले, ‘‘निसर्गासाठी केलेलं कर्म निसर्ग अनेक पटीने फिरून आपल्याला पुन्हा बहाल करतो. निसर्ग कोणतीही उधारी ठेवत नाही. त्यामुळे निसर्गासाठी खर्च केलेला वेळ वाया गेला, असे समजू नका.’’ त्यांच्या या संदेशातून निसर्ग संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित झाले.

या उपक्रमात अजिंक्य डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेजच्या ६५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाचे प्रा. दिलीप घुले यांनी आपल्या टीमसह विद्यार्थ्यांचे नेतृत्व केले. उपक्रमाचे नियोजन व व्यवस्थापन कर्म फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मयूर कांगणे, प्रा. अमोल काळे, विशाल डापसे, प्रविण हिंगे, तुषार कुताळ, प्रशांत रेपाळे आणि प्रियांका पाटील यांनी केले.

आळंदी येथील माऊलीवनात दर रविवारी सकाळी ६ ते ९ या वेळेत वृक्षसंवर्धन, वृक्षांची दुरुस्ती आणि पाण्याचे नियोजन केले जाते. या कामाचे व्यवस्थापन डॉ. विकास महांडुळे, डॉ. राहुल बराटे, प्रा. संगीता बोर्डे, प्रा. शिवाजी शिंदे, प्रा. सद्दाम मणियार, अथर्व विधाटे आणि अमित बनकर हे टीम सदस्य पाहतात.

या पर्यावरणपूरक उपक्रमाला आळंदी येथील ह. भ. प. श्रीनिवास महाराज घुगे यांनी शुभेच्छा दिल्या आणि उपस्थितांना शुभाशीर्वाद दिले. वृक्षसंवर्धनाची प्रतिज्ञा आणि पसायदानाने उपक्रमाची सांगता झाली.

‘लक्ष्य १००० वटवृक्ष’ या संकल्पातून वृक्षलागवडीसोबतच वृक्षांचे संगोपन, पाण्याचे नियोजन आणि नैसर्गिक परिसंस्था निर्माण करण्याचा कर्म फाउंडेशनचा प्रयत्न पर्यावरण संवर्धनासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# एसा सभासदांची चिचोंडी शिराळ येथील आनंद तीर्थला भेट

**| स्थापत्य कलेचा सर्वोत्कृष्ट आविष्कार साकारण्याचे कार्य गुरु आनंद फाउंडेशने केले**

**| आनंद तीर्थाचे काम लवकरच पूर्ण होणार – अशोक पितळे**



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर पासून अवघ्या तीस किमी अंतरावर राष्ट्र संत परमपूज्य आनंद ऋषीजी महाराज यांच्या जन्मगावी विविध मंदिर, प्रशासकीय इमारत, भक्तनिवास, भोजनालय अश्या विविध इमारतींची कामे चिचोंडी शिराळ येथे मागील दहा वर्षापासून चालू आहेत. आपल्या शहरापासून जवळच सुबक, आकर्षक आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून चालू असलेल्या कामांना संस्थेच्या वतीने भेट देण्याचे नियोजन ट्रस्टची परवानगी घेऊन करण्यात आले. संस्थेच्या जवळपास ७० आर्किटेक्ट इंजिनीअर्स आणि त्यांचे कुटुंबीय यांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला. या परिसरात शमोशरण तीर्थ, नावकार कलश तीर्थ, गुरु चरण तीर्थ अश्या जैन समाजाच्या दृष्टीने पवित्र मंदिरांचे स्थापत्य कलेच्या दृष्टीने आताच्या काळातील सर्वोत्कृष्ट बांधकामे उभारण्याचे काम चालू आहे.

संस्थेच्या सभासदांनी पाँडिचेरी येथील २०१० साली मातृ मंदिराच्या धर्तीवर उभारण्यात आलेले लोटस टेम्पलला स्टडीटूर द्वारे भेट दिली होती. याच धर्तीवर साकारण्यात येत असणारे गुरू चरण तीर्थ हे या अभ्यास दौऱ्याचे मुख्य आकर्षण होते. भारतातील सुप्रसिध्द आर्की. देवेंद्र सोमपूरा यांनी गुरू चरण तीर्थ या मुख्य मंदिराचे प्लॅनिंग केले आहे. जवळपास ३०,००० चौ फूट क्षेत्राचा बिल्ट अप, मधील केंद्रस्थानी ८० फूट उंच. स्टील ऐवजी एफ आर पी बार चा वापर आणि ८० एम पी ए ताकदीचे काँक्रिट, ग्रीड स्लॅब , प्रचंड पाकळ्यासाठी वापरलेले फेरो सिमेंट सारखे तंत्रज्ञान, तसेच नैसर्गिक ए सी कुलर सिस्टीमसाठी कौलारू प्लेट मधून पाणी आणि हवा वाहून जाण्यासाठी केलेली योजना. अश्या विविध छटा या इमारतीमध्ये दिसून आल्या. एंट्री जवळील एसा संस्थेचे आर्की. प्रितेश गुगळे यांनी प्लॅनिंग केलेले आणि इंजि. शाम गुलाटी इंजि. धनेश मुनोत यांनी साकारलेली प्रशासकीय इमारत तसेच तेथील ऑडियोटोरियम हॉल लक्ष वेधून जातो.

त्यानंतर भक्त निवास आणि भोजन कक्ष ज्याचे काम आर्की. प्रमोद बेरी सरांच्या कामाची छाप दर्शवितो. अहिल्या नगर पासून ३० की मी अंतरावर इतक्या चिचोंडी सारख्या खेडेगावात इतक्या मोठ्या प्रमाणात वास्तू विशारद, अभियांत्रिकीचा, लँडस्केप यांचा आविष्कार असणारे काम पाहण्यास मिळणे ही संस्थेच्या उपस्थित सभासदांसाठी मोठ्या समाधानाची बाब होती. आनंद तीर्थ प्रकल्प भेट अतिशय ज्ञानवर्धक सर्वांना प्रेरणादायी तसेच भक्तिमय वातावरणात पार पडली. गुरुआनंद फाउंडेशन ट्रस्ट मार्फत शहरापासून जवळ अतिशय उच्च दर्जाचे काम पाहण्यास मिळणे हा सर्व एसा सभासदांसाठी आश्चर्याचा सुखद धक्काच होता. प्रवेश द्वाराजवळील इमारतीपासून, भक्त निवास, गुरू चरण मंदिर, ध्यान केंद्र मंदिर, कलश मंदिर अशी विविध स्ट्रक्चर आणि त्यांची कामे आमच्या आर्किटेक्ट इंजिनीअर्स यांच्या दृष्टीतून पाहण्यासारखी आहेत. सर्वांना तेथील वातावरण, लँडस्केप, आर्कीटेक्चरल सौंदर्य आणि सिव्हिल इंजिनीअरिंग मधील कामांची गुणवत्ता प्रभावित करणारी आहेत.

त्याच बरोबर रस्त्यांची कामे, लेव्हल, रंगसंगती, शिस्त , भोजन व्यवस्था उच्च दर्जाची आहेत. आनंद तीर्थ येथील सर्व अधिकारी आणि स्टाफने अतिशय चांगली वागणूक एसा सभासदांना दिली. गुरुआनंद फाउंडेशन ट्रस्टचे अध्यक्ष सी ए सतीश सुराणा, ट्रस्टी अशोक पितळे , ट्रस्टी सुनील नहार यांचे हे सर्व स्ट्रक्चर्स उभारणीत मागील दहा वर्षांपासून भरीव योगदान आहे. आनंद तीर्थ वरील व्हिजिट निमित्ताने आम्हाला सिव्हील इंजिनियरिंग क्षेत्रातील एक चांगले स्थापत्य शिल्प पाहण्याची आणि तांत्रिक स्टाफ कडून त्याची तांत्रिक माहिती करून दिल्याबद्दल संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. आनंद तीर्थ येथील व्यवस्थापक संजय गुगळे, तेथील तांत्रिक काम पाहणारे प्रविण वाकचौरे आणि सुमित कुमावत यांनी कामास वापरलेले साहित्य, वेगवेगळ्या इमारतींचे प्लॅनिंग केलेले आर्किटेक्ट, कामासाठचे आधुनिक तंत्रज्ञान याविषयी उपयुक्त माहिती एसाच्या आर्किटेक्ट आणि इंजिनीअर्स यांना दिली. या सर्व आयोजनात संस्था सभासद आर्की. कविता जैन, आर्कि. प्रितेश गुगळे आणि दादासाहेब बेरड यांचे मोलाचे सहकार्य लाभले तसेच अहिल्या नगर मधील नामवंत सी ए आणि गुरू आनंद फाउंडेशनचे ट्रस्टी अशोक पितळे यांनी भरीव सहकार्य केले.

# पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांचे डीएसओ व सीबीएसई क्रीडा स्पर्धांमध्ये घवघवीत यश

**विविध क्रीडा प्रकारांत प्रथम क्रमांकासह पदकांची कमाई; शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा**




**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पोदार इंटरनॅशनल स्कूल, अहिल्यानगरच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा तसेच क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत शाळेचा नावलौकिक वाढविला आहे. बुद्धिबळ, कुस्ती, नेमबाजी, पोहणे, मैदानी खेळ, बास्केटबॉल आणि स्केटिंग,आईसस्टॉक, अशा विविध क्रीडा प्रकारांत विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील पुणे विभागांतर्गत आयोजित जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये १४ वर्षांखालील गटात आर्यन देवकर याने बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. कृष्णा रोहोकले याने कुस्तीमध्ये, तर आरुष इंगळे याने नेमबाजीमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. आरुषने गोळाफेक स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवत दुहेरी यश संपादन केले. श्रावणी देशमुख हिने पोहण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून आपले कौशल्य सिद्ध केले. मैदानी स्पर्धांमध्ये स्वरदा तिपोळे, आरुषी गायकवाड, काव्या झावरे आणि संस्कृती गाडगे यांनी रिले स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला. स्वरदा तिपोळे हिने लांब उडीमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. बास्केटबॉल स्पर्धेत इयत्ता आठवीतील यशराज ठुबे, अरहम सुराणा, कृष्णा पानसरे, साई जाधव, रुद्र साठे, रुद्र शेवगावकर आणि इयत्ता सातवीतील आर्यन वाकचौरे यांनी प्रथम क्रमांक मिळवत सांघिक खेळातील आपली गुणवत्ता सिद्ध केली.

१७ वर्षांखालील गटात इयत्ता दहावीतील रुद्र आहेर याने तिहेरी उडी आणि लांब उडी या दोन्ही स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. देव लोढा याने लॉन टेनिस स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला, तर स्वरा तांबे हिने तिहेरी उडीमध्ये प्रथम क्रमांक मिळवून यशाची परंपरा कायम राखली. याशिवाय, इयत्ता दुसरीतील आराध्या टापरे हिने बेंगळुरू येथे झालेल्या स्केटिंग स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली. विद्यार्थ्यांच्या या यशामागे सातत्यपूर्ण सराव, मेहनत आणि योग्य मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. शाळेचे क्रीडा शिक्षक सचिन पठारे, सीमा लाड आणि नंदिनी मेहत्रे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे प्राचार्य मंगेश जगताप, उपप्राचार्य शगुफ्ता काझी, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आशुतोष नामदेव, प्रशासकीय अधिकारी नितीन गवांदे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील प्रगतीला नवी दिशा मिळाली असून, त्यांच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पोखर्डीतील श्रीराम नगरला टँकरने पाणीपुरवठा सुरू करावा

**पालकमंत्र्यांकडे मागणी,अन्यथा आंदोलन**

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील पोखर्डीतील श्रीरामनगर वस्ती व परिसरात बुऱ्हाणनगर पाणी योजनेतून पाणीपुरवठा होत असून गेल्या पंधरा दिवसांपासून पाणीपुरवठा बंद झाल्याने स्थानिक नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी तीव्र पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. तरी पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी याबाबत लक्ष घालून तातडीने शासकीय टँकरने पाणीपुरवठा सुरू करावा व पाणी प्रश्न सोडवावा.अशी मागणी जनसेवा ड्रायव्हर पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष गोरक्षनाथ कराळे यांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात त्यांनी म्हटले की गेल्या अनेक महिन्यांपासून बुऱ्हाणनगर पाणी योजनेतून अत्यंत अनियमित पाणीपुरवठा होत आहे. पोखर्डी गावाला बऱ्याच महिन्यांपासून १५ दिवसातून एकदाच पाणी येते.सध्याच्या दुष्काळजन्य परिस्थितीमुळे ही बाब असेल तर ४ दिवसांमधून १ वेळा शासकीय टँकरने पाणीपुरवठा सुरू करावा. १५ दिवसातून एकदाच पाणी न सोडता किमान ४ दिवसाला पाणी सोडावे. पिण्याचे पाणीटंचाईने नागरिक हैराण झाले आहेत. तरी १० दिवसात शासकीय टँकरने किंवा योजनेतून सुरळीत पाणीपुरवठा करून नागरिकांना दिलासा द्यावा. दहा दिवसात पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास जनसेवा ड्रायव्हर पार्टी व पोखर्डी ग्रामस्थांच्या वतीने शेंडी बायपास चौकात तीव्र रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा गोरक्षनाथ कराळे यांनी दिला आहे. याबाबत जिल्हाधिकारी साहेब यांना भेटून वस्तुस्थिती सांगितली, तसेच सर्व विभागांना ई-मेल आयडीवर माहिती दिली, आपले सरकार पोर्टलवर तक्रार करून सुद्धा कुठलाही ठोस निर्णय घेतला जात नाही, कुठलीच कार्यवाही झाली नाही. त्यामुळे पालकमंत्री ना.विखे पाटील यांनी लक्ष घालून हा प्रश्न सोडवावा अशी अपेक्षा कराळे यांनी व्यक्त केली.

(पान १ वरून)

## भाजपमध्ये आलेल्या नवीन माणसाचे काय हाल होतात, हे मी बघितले आहे

पंतप्रधानांना भेटलो. यामुळं काहीही बिघडत नाही आणि आपली फिलोसोफी बदलत नाही. मला देखील अनेकवेळा इकडे (भाजपमध्ये) या असं म्हटलं गेलं मात्र मी म्हटलं मी तिकडे (काँग्रेस) आहे तर इकडं (भाजपमध्ये ) येऊन परत काय करणार असे शिंदे म्हणाले. मी जिथे आहे (काँग्रेसमध्ये) तिथलच काम करणार आहे. इकडं (भाजपमध्ये) येऊन परत तुमच्यात ढवळाढवळ नको असेही शिंदे म्हणाले.

भाजपमध्ये आलेल्या नवीन माणसांचे काय हाल होतात हे सुद्धा मी बघितलेल आहे असे सुशीलकुमार शिदे म्हणाले. २५ वर्षांपूर्वी सुद्धा असच होत होते असे ते म्हणाले. त्यावेळी एकत्रित सगळेच पक्ष सोडून गेले पुन्हा ४ ते ५ वर्षात गेलेले सगळे परतल्याचे शिंदे म्हणाले. राजकारणात देखील चुका होत असतात त्यामुळे पत्रकारांनी त्या चुकांचे विश्लेषण केले पाहिजे असेही सुशीलकुमार शिंदे म्हणाले. नकळत एखाद्याकडून जर चूक झाली असेल तर ती समजून घेतली आहे, आपली लोकशाही ही वर चढत जाणारी आहे, त्याला काळिमा लागता कामा नये असे शिंदे म्हणाले.

# पोलीस हुतात्म्यांच्या शौर्याला डॉ. उद्धव शिंदे यांची आदरांजली

**देशाच्या सुरक्षेसाठी प्राणार्पण करणाऱ्या वीर जवानांचे बलिदान सदैव प्रेरणादायी– डॉ. शिंदे**

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** देशाची सुरक्षा आणि नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी कर्तव्य बजावताना प्राणांची आहुती देणाऱ्या पोलीस हुतात्म्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी २१ ऑक्टोबर रोजी पोलीस स्मृतिदिन पाळण्यात येतो. या निमित्ताने अहिल्यानगर पोलीस मुख्यालय येथे स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी हुतात्मा पोलीस जवानांना आदरांजली अर्पण केली.

यावेळी डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, ‘‘देशाची अंतर्गत सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था आणि नागरिकांचे संरक्षण यासाठी पोलीस दल अहोरात्र कार्यरत असते. कर्तव्य बजावताना प्राणांचे बलिदान देणाऱ्या पोलीस जवानांचा त्याग हा संपूर्ण देशासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या शौर्याची आणि समर्पणाची आठवण प्रत्येक नागरिकाला देशसेवेची प्रेरणा देणारी आहे. हुतात्म्यांच्या बलिदानाचा आदर राखणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.’’



२१ ऑक्टोबर १९५९ रोजी लडाखमधील हॉट स्प्रिंग्ज येथे चिनी सैन्याशी झालेल्या संघर्षात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या दहा जवानांनी सर्वोच्च बलिदान दिले. त्यांच्या स्मरणार्थ हा दिवस पोलीस स्मृतिदिन म्हणून पाळला जातो. देशभरात कर्तव्य बजावताना हौतात्म्य पत्करलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या शौर्याचे स्मरण करून त्यांना अभिवादन करण्यात येते.

या प्रसंगी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, पोलीस उपअधीक्षक (ग्रामीण) शिरीष वमने, परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक कल्पना पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात, राखीव दलाचे पोलीस निरीक्षक उमेश परदेशी, राष्ट्रपती पोलीस पदकप्राप्त सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अन्वरअली सय्यद आदी मान्यवर उपस्थित होते.